# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १९९ वा शुक्रवार दि.५ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


# २०० कंत्राटदारांनी ५० कोटींचा कर चुकवला; मराठवाड्यात महाघोटाळा

छ. संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये केंद्रीय जीएसटी पथकाने मोठी कारवाई केली. २०० कंत्राटदारांनी मिळून जवळपास ४० ते ५० कोटींचा कर चुकवला असल्याची माहिती समोर आली आहे. बोगस कंपन्यांच्या बिलांद्वारे हा घोटाळा करण्यात आला आहे. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.




जाफर कादर या व्यक्तीच्या नावाने एक बोगस कंपनी आहे. जिचा वापर कर चुकवण्यासाठी करण्यात आला होता. जीएसटी विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०० ते २५० कोटी रुपयांची बोगस बिले घेतली. सिमेंट विक्रीच्या ९ कंपन्या स्थापन केल्या. जवळपास २०० गुत्तेदारांनी या कंपनीची बिले घेतली. कागदावर असलेल्या कंपनीचा मालक असलेल्या कादरला अटक करण्यात आली आहे. त्याच्या बोगस कंपन्यातून कंत्राटदारांनी बिले दाखवली आहेत.

केंद्रीय जीएसटी पथकाने २०० ते २५० कोटी रुपयांचा बोगस बिलांचा घोटाळा समोर आणला आहे. जालना जिल्ह्यात सिमेंट विक्रीच्या ८ ते ९ बोगस कंपन्या स्थापन करण्यात आल्यात. या घोटाळ्यातून ४० ते ५० कोटींचा जीएसटी बुडवण्यात आल्याचा ठपका आहे. बिले घेणाऱ्या कंत्राटदारांचा शोध सुरू आहे. या घोटाळ्यात काही सीए यांचा हात असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घोटाळ्यात मराठवाड्यातील लातूर, धाराशीव वगळता ६ जिल्ह्यातील २०० कंत्राटदारांचा या घोटाळ्यात समावेश आहे. जाफर कादर ही व्यक्ती त्याच्या नावे ८-९ कंपन्या असून त्यातील एकही कंपनी अस्तित्वात नाही. बिले घेणाऱ्या कंत्राटदारांकडे रस्ते बांधकाम, पाणी पुरवाठ्याशी संबंधित बांधकाम आदी प्रकारच्या कामांची कंत्राटे होती. त्यामुळे या कंत्राटदारांनी किती दर्जेदार कामे केली आहेत, याबद्दल ही चर्चा सुरू झाली आहे.

राज्यात याआधीदेखील जीएसटीशी संबंधित घोटाळे उघड

याआधीदेखील राज्यात जीएसटी घोटाळा उघडकीस आला होता. सांगली जिल्ह्यात यापूर्वी विजयनगर येथे गुजरातमधील व्यापाऱ्याने खोबरं विक्री दाखवून विभगाला चार कोटी रुपयांचा चुना लावला होता. तसेच दुसऱ्या एका प्रकारात जतमध्येही एका शेतमजुराच्या आधार, पॅनचा वापर करुन कोट्यवधींची बोगस विक्री दाखवत जीएसटी चोरी केली होती. नाशिकमध्ये भंगार व्यापाऱ्यांचा १०० कोटींचा जीएसटी घोटाळा झाला असल्याची माहिती मिळत आहे. बनावट कागदपत्रांद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवत फसवणूक झाल्याची माहिती समोर आली होती.


# नोव्हेंबर २००५ नंतरच्या कर्मचा-यांना जुनी पेन्शन

मुंबई : प्रतिनिधी-१ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या जाहिरातीनुसार १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. जुन्या पेन्शन योजनेचा पर्याय कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्यात येईल व या खात्यात नवीन अंशदान निवृत्ती वेतन खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज १० महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी राज्य शासकीय कर्मचा-यांनी मागच्या महिन्यातच बेमुदत संपाची हाक दिली होती. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३१ मे २००५ पूर्वी जाहिरात दिलेल्या अधिसूचित पदांवर नियुक्त्या झालेल्यांसाठी जुनी पेन्शन लागू करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले होते. सुमारे २६ हजार अधिकारी, कर्मचा-यांना याचा फायदा होणार आहे. त्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार या बाबतचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला व त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयाचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचा-यांना एक वेळ पर्याय देण्यात येणार आहे. या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यापासून ६ महिन्यांच्या कालावधीत हा पर्याय निवडणे बंधनकारक राहील.जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत. त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. अधिकारी व कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील. जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय संबंधित अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिका-यांकडे सादर करावा. हा कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू होण्यास पात्र झाल्यास तशा पद्धतीचे कार्यालयीन ज्ञापन संबंधित नियुक्ती प्राधिका-याने पर्याय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या आत द्यावे. तसेच संबंधित कर्मचारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे खाते तात्काळ बंद केले जातील. जे अधिकारी व कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्यात येईल.

# किनवट येथे १२ जानेवारी रोजी जिजाऊ,सावित्री संयुक्त जन्मोत्सव.?

किनवट / शेख शौकत : - राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले संयुक्त जन्मोत्सव समिती आयोजित किनवट येथे १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांचा संयुक्त जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

दि.३१-डिसेंबर रोजी किनवट गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त बैठक घेण्यात आली.यामध्ये ३- जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंती व १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती असून ह्या दोन्ही जयंत्या एकत्रित साजऱ्या करण्यात येणार असल्याचे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले संयुक्त जन्मोत्सव समितीच्या आयोजकांनी याठिकाणी ठरवले. तसेच ३-जानेवारी पासून ते ११-जानेवारी पर्यंत प्रत्येक गावात खेड्यात शहरात जाऊन संयुक्त जयंतीचा प्रचार प्रसार करून दिनांक १२ जानेवारी रोजी शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ चौकात हा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे.यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ सावित्रीबाई फुले संयुक्त जन्मोत्सव समितीचे आयोजक समाज बांधव बैठकीस उपस्थित होता.



# सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमीत्त लातूरात महिलांची भव्य रॅली संपन्न

लातूर :- ३ जानेवारी २०२४ रोजी क्रांतीज्योती सावित्रीमाई सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून महिलांच्या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते . या रॅलीची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून व अभिवादन करण्यात आले .या भव्य रॅलीमध्ये विविध परिवर्तनवादी विचाराच्या संघटनेच्या महिला, शाळा, कॉलेज,नर्सिंग स्कूल , मधील विद्यार्थीनी , शिक्षिका तसेच इतर सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या महिला व विद्यार्थिनी उपस्थित होत्या .या रॅलीमध्ये ५०० पेक्षा जास्त महिलानी उस्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या. सावित्रीमाईची मिरवणूक सजवलेल्या रथातून बॅन्ड -ताशाच्या जल्लोशात वाजत गाजत व घोषणा देत मुख्य रस्त्याने निघाली होती.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून ही रॅली जुना रेणापूर नाका येथे पोहोचली.





येथील तीस फूट उंच उभारलेल्या सावित्रीमाई फुले यांचा फोटो लावण्यात आला होता. या ठिकाणी रॅलीचे समारोप करण्यात आला. यावेळी झालेल्या जाहिर सभेत जुना रेणापूर नाक्याला क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले चौक असे नाव देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली . तसा ठराव टाळ्यांच्या गजरात पारीत करण्यात आला. या ठिकाणी लावण्यात आलेला सावित्रीमाई फुलेंचा तीस फुटी कट आउट आणि रोषणाई सर्वाचे लक्ष वेधून घेत होती. यावेळी सावित्रीमाईच्या जीवनावर विविध महिलांनी व्याख्यान व मनोगत व्यक्त केले. तसेच मी सावित्री बोलतेय ही सावित्रीबाईच्या जीवनावर एकपात्री एकांकिका वैभवी घारगावकर यांनी सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगलताई कांबळे यांनी केले .कार्यक्रमाचे प्रस्ताविक महानंदाताई शेवाळे यांनी केले. तर कार्यक्रमाचाअध्यक्षीय समारोप लक्ष्मीबाई कांबळे यांनी केला. आभार प्रदर्शन सुजाताताई अजनीकर यांनी केले .जयंती समितीचे सचिव राणी लांडगे, संयोजक सुशीला आजणीकर, शारदा हजारे ,अनिता फुटाणे ,विद्या ससाने ,मायाताई यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करण्यामध्ये सर्वश्री नरसिंग घोडके गुरुजी, प्रा.डॉ.हर्षवर्धन कोल्हापूर सर, इंजि.श्रीधर शेवाळे, डी. एस. नरसिंगे, सुभाष सूर्यवंशी , रामराजे आत्राम, यु. डी.गायकवाड, शिरीष दिवेकर आदींचा सहभाग होता.

तरी सर्व बहुजन समाजातील महिला व पुरुषांनी तन-मन-धनानी क्रांतीज्योती सावित्री माई फुले यांच्या जयंतीनिमित्त जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे संयोजकांनी आभार मानले. अशाच प्रकारे यापुढेही सार्वजनिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभाग मिळेळ अशी अपेक्षा संयोजकांनी व्यक्त केली आहे.

# धम्म परिषदेला जत्रेचे स्वरूप येऊ नये: आमदार जिग्नेश मेवाणी.

किनवट / शेख शौकत : - किनवट तालुक्यात मागील अनेक वर्षांपासून चालू असलेल्या धम्म परिषदेचे आयोजन ११ व १२ फेब्रुवारी २०२३ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी आंबेडकरी चळवळीचे निडर उभरते नेतृत्व असलेल्या गुजरात येथील आमदार जिग्नेश भाई मेवाणी यांनी स्वतः किनवट येथे येवून होणाऱ्या धम्म परिषदचा कार्यक्रमाची आखणी करताना धम्म परिषद ही चळवळ कशी बनेल आणि त्या साठी काय काय करायचे यासाठी सर्व कार्यकर्त्यांची बैठक घेत मागदर्शन केले आहे. तालुक्यात मागिल अनेक वर्षांपासून धम्म परिषद होत आहेत.होणारी ही धम्म परिषद केवळ जत्रा न ठरता त्यामधून एक वेगळा संदेश धम्म बांधवापर्यंत जावा,धम्म परिषद ही चळवळ कशी बनेल आणि त्यातून जागतिक पातळीवर किनवट तालुक्याची ओळख बनली पाहिजे असे मत त्यांनी मांडले.आज रोजी आय आय टी सारख्या देशातील शैक्षणिक संस्थेतून आपले अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण सोडण्यास भाग पाडले जात आहे,परदेशी शिक्षण घेण्यासाठी असलेली शिष्यवृत्ती बंद केली आहे आणि शेतकऱ्यांवर होणारे अन्याय अश्या विविध प्रकारच्या समस्या धम्म परिषद माध्यमातून मांडत धम्म परिषद ही चळवळ कशी बनेल याबाबत नियोजन करण्याचे मत मांडले आणि सर्व कार्यकर्त्यांनी एक मुखाने त्याला होकार देत चळवळ उभारण्याची तयारी बोलून दाखवली आहे. या उद्देशाने आपण संयोजन समितीच्या सदस्यांशी चर्चा करण्यासाठी येथे आलो आहे,असे प्रतिपादन आमदार जिग्नेश मेवाणी (गुजरात )यांनी केले.यानिमित्ताने पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.



त्यांच्या समवेत केशव वाघमारे व सुमेध हे कार्यकर्ते ही उपस्थित होते.

परिषद झाल्यावरही परिषदेतून काही चांगल्या स्वरुपाचे काम उभे व्हावे व या कामांशी आपण सतत संपर्कात रहावे ,असा आपला उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी धम्म परिषदेचे कार्यकर्ते राहुल कापसे,अभय नगराळे,प्रज्ञानंद खडसे,अरुण आळणे, सुगत नगराळे,प्रमोद मूनेश्वर,पत्रकार गोकुळ भवरे,पत्रकार सुरेश कावळे,पत्रकार स्वप्नील भालेराव आणि संपादक प्रशांत वाठोरे आणि पत्रकार शेख शोकत यांच्या सह काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# नेरूळ येथे महीलांच्या वतीने सावित्रीमाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

नवी मुंबई / के. एच. हनवते :- कपिलवस्तू बुद्ध विहार सेक्टर १० नेरूळ नवी मुंबई येथे समता समाज महीला संघ यांच्या वतीने राष्ट्रमाता स्त्री शिक्षणाच्या जनक : सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी आनेक महीलांनी सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आपल्या गित गायन, कवितेतून सावित्रीमाईच्या कार्याचा गुणगौरव केला. इंदुताई चंदनशिव यांनी सावित्रीमाईंच्या वेषभुषेतुन समाज प्रबोधन केले. त्यावेळी मालाताई मेश्राम, दया झेंडे यांनी आपल्या नेहमी प्रमाणेच गित गावुन श्रोत्याची मने जिंकली तर वनिता बनसोडे यांनी आपल्या उत्कृष्ट भाषणात सावित्रीमाईंच्या उल्लेखनीय कार्याचा उल्लेख करून वनिता बणसोडे म्हणाल्या की, देवाला सोडलेल्या महिला, देवदासी झाल्या, खंडोबाला पुजणाऱ्या महिला मुरळ्या झाल्या पण १८४८ ला सावित्रीमाई फुलेंनी मुलींची पहीली शाळा सुरू केली म्हणूनच आजघडीला शिक्षणक्षेत्रात मुली ऊंच भरारी घेत आहेत ज्या मुलींनी शिक्षण घेतले त्या मुलींनी सावित्रीमाईला वंदन करणाऱ्या महिला आज इंजिनीअर झाल्या, डॉक्टर झाल्या, वकिल झाल्या, शिक्षिका झाल्या, मुख्याध्यापिका झाल्या, पोलिस झाल्या, सरपंच झाल्या, ग्रामसेविका झाल्या, नगरसेविका झाल्या, नगराध्यक्ष झाल्या, महापौर झाल्या, कलेक्टर झाल्या, मंत्री झाल्या, मुख्यमंत्री झाल्या, प्रधानमंत्री झाल्या आणि राष्ट्रपती झाल्या त्या भारतीय स्त्रिया आज कधीच तिचे ऋण फेडू शकत नाहीत. आसेही वनिता बनसोडे यांनी आपल्या भाषणात म्हणाल्या आज सावित्रीमाई यांचा जन्मदिवस स्त्री-मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. ज्ञानज्योती, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त लहान थोर महीलांनी अधिक संख्येत उपस्थित राहून एकमेकांना पेढे वाटप करून आनंद व्यक्त करून हार्दिक शुभेच्छा दिल्या.



# जळकोट तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार संपावर

जळकोट : प्रतिनिधी अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटना व किरकोळ पन्हाळा धारक महासंघाच्या वतीने दि १ जानेवारीपासून राज्यातील विविध स्वस्त धान्य दुकानदार संपावर गेलेले आहेत . या संपामध्ये जळकोट तालुक्यातील ५७ रास्त भाव दुकानदार सहभागी झाले आहेत अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष पंडितराव गुट्टे व उपाध्यक्ष बापुराव हासुळे पाटील यांनी दिली.रास्त भाव दुकानदारांच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे हे बेमुदत उपोषण सुरू आहे. ही पॉश मशीनसाठी २ जी ऐवजी ५ सेवा देण्यात यावी, रास्त भाव दुकानदारांचे कमिशन व वाटपाचे कमिशन दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत दुकानदारांच्या खात्यावर जमा करावे, रास्त भाव दुकानदाराचे कमिशन वाढविण्यात यावेकिंवा प्रति महिना पन्नास हजार रुपये मानधन देण्यात यावे, शेतकरी योजनेचे धान्य सुरू करण्यात यावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# मतदान होणार; प्रतिनिधित्वाचे काय?

आपला शेजारी देश पाकिस्तानात पुढच्या महिन्याच्या आठ तारखेला सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत.पाकिस्तानात सार्वत्रिक निवडणुकांचे वातावरण चांगलेच तापू लागले आहे. प्रमुख विरोधी पक्षाला जर सार्वत्रिक निवडणुकांपासून जाणीवपूर्वक दूर ठेवले तर त्यानंतर अस्तित्वात आलेले कायदेमंडळ खरेच जनमताचे प्रतिनिधित्व करणारे असेल का, हा खरा प्रश्न आहे. याचे उत्तर नकारार्थी आहे.आपला शेजारी देश पाकिस्तानात पुढच्या महिन्याच्या आठ तारखेला सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. तेथील निवडणूक आयोगाने माजी पंतप्रधान आणि नामवंत क्रिकेटपटू इम्रान खान यांचा निवडणूक अर्ज फेटाळलेला आहे. सध्या इम्रान खान तुरुंगात आहेत. नैतिकतेच्या मुद्दयावरून दोषी ठरल्यामुळे तुरुंगवास भोगत असलेल्या इम्रान खान यांना दोन मतदारसंघांतून उमेदवारी नाकारण्यात आली आहे.पाकिस्तानच्या निवडणूक आयोगाने 'पाकिस्तान तेहरिक ए इन्साफ' या पक्षाचे (स्थापना : १९९६) संस्थापक इम्रान खान आणि त्यांच्या अनेक ज्येष्ठ सहका-यांचे उमेदवारी अर्ज नाकारले आहेत. इम्रान खान तोशाखाना भ्रष्टाचारप्रकरणी दोषी ठरल्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला. मात्र हे एकमेव कारण नाही. याव्यतिरिक्त त्यांच्या उमेदवारी अर्जाचे सूचक आणि दुय्यम सूचक हे इम्रान खान यांच्या मतदारसंघातील नव्हते.नामनिर्देशपत्रातील या त्रुटीकडे लक्ष वेधत निवडणूक आयोगाने उमेदवारी अर्ज नाकारला आहे. तोशाखाना भ्रष्टाचार प्रकरणातील इम्रान खान यांच्या शिक्षेला इस्लामाबाद उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असली तरी त्यांची पाच वर्षांची अपात्रता अजूनही कायम आहे. याचा साधा अर्थ असा की पुढच्या महिन्यात होत असलेली लोकसभा निवडणूक इम्रान खान लढवू शकणार नाहीत.दुसरीकडे याच निवडणूक आयोगाने माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांचा उमेदवारी अर्ज मात्र दाखल करून घेतला आहे. शरीफ यांनी मनसहारा आणि लाहोर अशा दोन मतदारसंघांतून अर्ज दाखल केला आहे. या खेपेला शरीफ यांच्यामागे लष्करशहा उभे आहेत, असे उघडपणे बोलले जाते.पाकिस्तानात भारताप्रमाणे 'संसदीय लोकशाही' आहे. या शासनयंत्रणेत 'राजकीय पक्षां'ना यांना फार महत्त्व असते. या तुलनेत अध्यक्षीय पद्धतीत पक्षांना कमी महत्त्व असते. पाकिस्तानात याआधी जुलै २०१८ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या होत्या. भारताप्रमाणेच पाकिस्तानातील संसदेचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. याआधी तेथे २०१३ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या होत्या.२०१३ च्या निवडणुकांत नवाझ शरीफ यांच्या पक्षाने दणदणीत बहुमत मिळवले होते. मात्र २०१८मध्ये त्यांना तेथील हितसंबंधीयांनी निरनिराळे कट करून या निवडणुकीपासून दूर ठेवले. एवढेच नव्हे तर २०१७मध्ये त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप लावून त्यांना पंतप्रधानपदावरून काढले.याची पुढची पायरी म्हणजे तर २०१८ मध्ये निवडणुका होण्याअगोदर तेथील न्यायालयाने दहा वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. अशा प्रकारे तेथील हितसंबंधीयांनी लष्कराच्या मदतीने 'पाकिस्तान मुस्लिम लीग' हा शरीफ यांचा पक्ष जायबंदी केला होता. आता तेच लष्कर शरीफ यांना पाठिंबा देत असल्याचे म्हटले जाते.२०१८ च्या निवडणुकांत लष्कराने इम्रान खान यांच्या पक्षाला झुकते माप दिले होते. हे निवडणुका होण्याआधीपासून स्पष्ट दिसत होते. परिणामी इम्रान खान जिंकतील आणि ते पाकिस्तानचे पंतप्रधान होतील, याबद्दल फारशी शंका नव्हती. खरी धक्कादायक बातमी म्हणजे लष्कराचा एवढा उघडपणे पाठिंबा असूनही इम्रानखान यांच्या पक्षाला तेव्हा स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते.पाकिस्तानच्या लोकसभेत एकूण ३४२ खासदार असतात. या निवडणुकात इम्रानखान यांच्या पक्षाला म्हणजे 'पाकिस्तान तहरीक ए इन्साफ' या पक्षाला ११९ जागा, नवाझ शरीफ यांच्या पक्षाने ६४ तर बिलावल भुत्तो यांच्या पक्षाने फक्त ४३ जागा जिंकल्या. परिणामी इम्रान खान यांना आघाडी करून सत्तेत यावे लागले.यासाठी त्यांना मुत्ताहिदा क्वौमी मुव्हमेंट, पी. एम. एल., बलुचिस्तान अवामी पार्टी वगैरे पक्षांशी युती करावी लागली होती. यथावकाश इम्रान खान आणि लष्कराचे मतभेद झाले आणि १० एप्रिल २०२२ रोजी त्यांना राजीनामा द्यावा लागला. ते काही दिवस शांत होते. जुलै २०२२ मध्ये पाकिस्तानातील पंजाब प्रांतात विधानसभेच्या पोटनिवडणुका झाल्या. या पोटनिवडणुका वीस जागांसाठी होत्या.यातील पंधरा जागा इम्रान खान यांच्या पक्षाने दणदणीत बहुमताने जिंकल्या. या यशामुळे इम्रान खान यांचे विरोधक हबकले तर दुसरीकडे इम्रान खान यांना नवीन ऊर्जा मिळाली. गेली अनेक दशके पाकिस्तानच्या राजकारणात लष्कर महत्त्वाची भूमिका बजावत आले आहे.असा एक अंदाज आहे, की जेव्हा इम्रान खान यांना त्यांच्या हकालपट्टीचा अंदाज आला, तेव्हा त्यांनी आपल्या मर्जीतील लष्करी अधिकारी लेफ्ट. जनरल फैज अहमद यांना लष्करप्रमुख करण्याचा प्रयत्न केला होता. हा प्रयत्न फसला आणि इम्रान खान यांची गच्छंती अटळ झाली. तसे पाहिले तर इम्रान खान यांच्या पक्षाला पारंपरिक अर्थाने म्हणावे असे राजकीय तत्त्वज्ञान नाही.आपल्याकडे जसे अरविंद केजरीवाल, श्रीमती ममता बॅनर्जी यांचे पक्ष जसे एकखांबी आहेत, तसा इम्रान खान यांचा पक्ष आहे. इम्रान खान लष्कराच्या मदतीने सत्तेवर आले होते. याचे एकमेव कारण तेव्हा लष्कराला नवाझ शरीफ डोईजड झाले होते आणि लष्कराला बिलावल भुत्तोच्या पक्षाच्या विश्वास वाटत नव्हता. म्हणून लष्करशहांनी इम्रान खान यांना हाताशी धरले होते.आता मात्र लष्कर आणि इम्रान खान यांच्यातून विस्तव जात नाही. मात्र आजही इम्रान खान लष्करातील काही अधिका-यांत कमालीचे लोकप्रिय आहेत. म्हणूनच इतर पक्ष आणि वरिष्ठ लष्करी अधिका-यांना इम्रान खान यांना आता मिळत असलेली लोकप्रियता खुपत आहे. जर येत्या लोकसभा निवडणुकांत इम्रान खान यांच्या पक्षाने लक्षणीय यश मिळवले तर त्यांचा पक्ष संसदेत सत्ताधारी पक्षाला पदोपदी त्रास देऊ शकतो.पाकिस्तानातील निवडणुका नेहमीच वादग्रस्त ठरत आलेल्या आहेत. आतासुद्धा प्रत्यक्ष मतदानाला एक महिना असूनही तेथील काही मानवी हक्क संघटनांनी आणि निःपक्ष अभ्यासकांनी निवडणुका खुल्या वातावरणातील होतील की नाही, याबद्दल शंका व्यक्त केल्या आहेत.त्यांच्या निरीक्षणांच्या समर्थनार्थ ते इम्रान खान यांच्या पक्षाला ज्या प्रकारे सरकार त्रास देत आहे, त्या घटनांचा उल्लेख करतात, त्यात तथ्य आहे. काळजीवाहू पंतप्रधान अन्वर ककर हेसुद्धा लष्कराच्या बाजूने झुकलेले आहेत, असेही आरोप होत आहेत.इम्रान खान यांचा उमेदवारी अर्ज नाकारल्यानंतर पाकिस्तानातील अनेक महत्त्वाच्या वृत्तपत्रांनी या निर्णयावर टीकेची झोड उठली आहे. अशा प्रकारे प्रमुख विरोधी पक्षाला जर सार्वत्रिक निवडणुकांपासून जाणीवपूर्वक दूर ठेवले तर त्यानंतर अस्तित्वात आलेले कायदेमंडळ खरेच जनमताचे प्रतिनिधित्व करणारे असेल का, हा खरा प्रश्न आहे. याचे उत्तर नकारार्थी आहे.

# स्मार्ट मोबाईल मुळे सत्य लपविता नाही आणि जग जवळ आले आहे?

. अमेरिकेत देव नाही,ना मठ नाही,पण पाऊस मात्र वेळेवर आहे व भरपूर आहे.गेल्या २०० वर्षात दुष्काळ नाही.कुठले होमहवन नाही,ना कसली वारी नाही.कसले अभिषेक नाही,ना अनुष्ठानं नाही.हरिनाम सप्ताह नाही,ना पारायणे नाहीत.अमेरिकेत लोकसंख्या नियंत्रणात आहे.अन्नधान्य विपूल आहे.सुखसोयी विपूल आहेत,कशाचीच कमतरता नाही.माणशी २८७६ वृक्ष आहेत.भारतात फक्त माणशी २८ झाडे आहेत. आपल्याकडे वृक्षवल्ली आम्हां सोयरे असे म्हटल्या जाते. पण एकही भारतीय झाड लावत नाही.विशेष उच्चशिक्षित सुरक्षित नोकरी करणारा त्या झाडाला जपत सुद्धा नाहीत. अमेरिकेत घरासमोर हिरवळ नाही असं एक ही घर किंवा बंगला दिसणार नाही.त्यांनी स्मार्ट मोबाईल वापर करून निसर्गाने दिलेल सत्य लपविले नाही. त्यामुळेच त्यांनी जग जवळ आणले आहे.

भारतात बहुसंख्ये लोकांच्या दारात झाड नाही.तर हिरवळ कुठली असणार ?. स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष झाली.पण राज्य व केंद्र सरकार साधं पिण्याच शुद्ध पाणी देवू शकत नाही.श्रीमंतासाठी स्वीमिंग पूलात स्वच्छ पाणी उपलब्ध आहे.बाकी सर्वच देवाच्या भरोशावर आणि सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे.अमेरिकेचे क्षेत्रफळ भारता पेक्षा तिप्पट आहे.आणि लोकसंख्या आहे ३१ कोटी. तर भारताची लोकसंख्या आहे १३५ कोटी.३५ कोटीची १३५ कोटी झाली. फक्त ८० वर्षात. एवढीच जबरदस्त प्रगती आहे. इथे हजारो जाती,सतराशे साठ धर्म.कुणाचाच मेळ कुणाला नाही.प्रत्येकजण म्हणतो आमचाच देव खरा.आणि तरी योग्य वेळी सर्वच म्हणतात गर्वसे कहो हम हिंदू है!. आणि देवाच्या आरत्या आता स्मार्ट मोबाईलवर लावल्या जात आहेत.






एक मुलगा सांभाळ करने कठीण झाले. तरी एकएकाला ४-५ लेकरं. कुत्र्यावाणी रस्त्यावर भटकत आहेत,ना शिक्षण,ना संस्कार.ना आचार,ना शिस्त, सगळं बिनधास्त.आणी मस्त.आताच पिण्यास पाणी नाही. तर पुढे काय?. कुणालाही पर्यावरणाची फिकर नाही.निसर्गाची चाड नाही.नुसतेच भरतात कुंभमेळे आणि जत्रा व यात्रा,जमात व धर्माचे मेळे होत आहेत. तेहतीस कोटी देवाचे नांव घेऊन प्रार्थना केल्या जात आहेत.ईश्वराशिवाय कुणी महान नाही.हे ऐकुण ऐकुण हजारो वर्ष झाली.दरवर्षी तेच.शेतकरी पाऊस पडला तरी आत्महत्या करतो. नाही पडला तरी आत्महत्या करतो. पाऊस पडलाच तर पिकाला भाव नाही.

सगळंयाना आरक्षण पाहीजे म्हणता म्हणता आरक्षण शंभर टक्के होण्याची वेळ आली. तरीही काही मिळनार नाही.वित्तमंत्री सितारामन यांनी संसदेत जाहीरपणे सांगीतले होते.देशातील १ लाख ६० हजार कंपन्या बंद झाल्या,सहाकोटी लोक बेरोजगार झाले. नोकरयांच नाही. तर आरक्षण घेवून काय चाटायचे. आता नोक-याच बंद होत आहेत.आहे त्या नोकरांनाच पगार देण्याची ताकद नाही.मॅचच फिक्स असेल.तर खेळायचेच कशाला.जनता दिशाहीन झाली आहे.स्वप्न राखेत मिसळली आहेत. संविधान नावांला उरले आहे.प्रचंड महागाई ने जनता मरणप्राय झाली आहे.तरी सरकार डिझेल पेट्रोलचे दर वाढवतच आहे. अनेक आजारामुळे दवाखाना कुटूंबाचे दिवाळं काढत आहे.जनतेला लुटण्यासाठी लुबाडण्यासाठी सरकार सहीत असंख्य गिधाडे सरसावली आहेत.चिंता व ताणतणावाने अर्धा भारता मधुमेह ग्रस्त झाला आहे. तीस टक्के लोकांना रक्तदाब आहे. शेतात काम करायला मजूर नाही.अंगमेहनतीला माणुस नाही.सगळे बिनकामाची माणसं आहेत.गावा गावात स्मार्ट मोबाईलमुळे जग जवळ येत आहे

नवरा साहेब व बायको मॅडम झाल्या आहेत.स्वयंपाकाला बाई,भांडी व धुण्याला बाई.तरी मॅडमची सतत पाठ व कंबर दुखते आहे.आणि साहेबांना टेकल्याशिवाय बसता येत नाही.कुंभ मेळ्यात दहा हजार सुशिक्षित व उच्चशिक्षित लोकांनी साधूची दिक्षा घेतली होती त्यातील काही राज्यात आमदार खासदार झाले आहेत. उत्तर प्रदेश मुख्यमंत्री सर्वांना माहिति आहेत,अनेक घोर तपश्या केलेल्या साध्वी मंदिरात देवाची पूजा अर्चना यज्ञ मंत्रोचार करून काही मिळत नाही म्हणून विधानसभा लोकसभा सभागृहात उपस्थित राहून वेतन,भत्ता इतर सवलती घेत आहेत. आणि अनेक तरुणा नोकरी नाही म्हणून आता रस्त्यावर बेरोजगार असल्यामुळे भटकत आहेत.कुटुंबापासून विरक्त झाले आहेत.लग्नाचे वय टळून गेले आहे. बायका मिळत नाहीत.गांवागावांत किमान चाळीस पन्नास पोरं पोरी बिन लग्नाची आहेत.भयंकर विदारक परिस्थिती आहे.स्मार्ट मोबाईलवर मैत्री जुळते आणि सत्य माहीत झाल्यावर तुटते त्यामुळे जग जवळ येत आहे.

बाजारात फळे बळेच पिकवून विकत आहेत. मराठी शाळा बंद पडल्या आहेत. मुलांना धड इंग्रजी येत नाही. आणि मराठी येत नाही.मराठी इंग्लिश मिक्स बोलत आहेत.टिव्ही वरच्या मालिका फालतू झाल्या आहेत.महिला गुन्हेगारी वृत्तीच्या जास्त दाखवलया जात आहेत.मुलं लहान पणा पासूनच हिसंक होत आहेत.१३ व्या वर्षीच मुलंमुली पळून जात आहेत.सरकारने कायदा काढला होता,१८ वर्षा नंतर लग्न झाले पाहिजे.आता त्यात बदल करून मुलामुलीचे लग्नाचे वय २१ वर्षे केले.मुलमुली १४/१५ वर्षाची झाली की लग्ना नंतर जे करायला पाहिजे ते सर्व अगोदर करून मोकळे होत आहेत.त्यामुळे आईवडील भावांना जातीची खानदानची इज्जत गेल्याचे वाटून खून करण्यात येत आहे.कायदे अनेक आहेत पण अंमलबजावणी प्रभावीपणे नाही. कारण स्मार्ट मोबाईल मुळे सत्य लपवित येत नाही आणि जग जवळ आले आहे. दारू कितीही महाग केली तरी त्यासाठी रांगा लागत आहेत.ती घेणे प्रतिष्ठेची झाली आहे.आणि प्रार्थना स्थळे बहुजन समाजाला लुटीची ठिकाणं झाली आहेत. वृद्धाआश्रमाची संख्या झपाट्याने वाढत आहेत.तो एक मोठा व्यवसाय होवू पहात आहे.आईला बाळासाठी वेळ नाही.पाळणाघरे वाढत आहेत. लेका-सुनांना सासुसासरे नकोत.वृद्धाश्रम,अनाथालये वाढत आहेत. माणसं पदोपदी खोटं बोलत आहेत.खोटं बोलणच खरं मानलं जात आहे. चोरांना लबाडांना प्रतिष्ठा मिळत आहे. सज्जनांना वेड्यात काढले जात आहे.लोकशाही समता बंधुता स्वातंत्र्य हे फक्त वाट्सअपचे संदेशा पुरतीच मर्यादित झाली आहे.

चांगले वागण्याचे करोडो मेसेज रोज फिरत आहेत. प्रत्येक जण चांगलं वागा म्हणत आहे. तरी आज काही सुना रॉकेल टाकुन जाळल्या जात आहेत. तर काही सुना सासु सासऱ्यांना घराबाहेर काढत आहेत.समाज व समाजातील वरिष्ठ नागरिक मजा पाहत आहेत.समाजाची भिती राहिल्या नसल्यामुळे लोकलज्ञा राहिली नाही.देशाचा प्रथम नागरिक राष्ट्रपती,उपराष्ट्रपती,लोकसभा सभापती,राज्याचा प्रथम नागरिक राज्यपाल आपले कर्तव्य अधिकार विसरून गुलामासारख वागताना दिसत आहे.स्मार्ट मोबाईल मुळे सत्य लपविता नाही. त्यामुळेच एकंदरीत भारत विस्फोटाच्या व उद्रेकाचा ज्वालामुखी बनत आहे.भारत मानवी वस्तीसाठी धोकादायक होत चालला आहे.वेळीच सावरलो नाही. तर आपल्या वारसांचे जीवन प्रचंड संकटाच्या गराड्यात सापडनार आहे. हे मात्र नक्की.स्मार्ट मोबाईल मुळे जग जवळ आले आहे तर नातेवाहिक दूर जात आहेत.

************

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडूप,मुंबई.**

# नवीन मोटार वाहन कायद्याच्या बाबतीत सरकारचा हेतू चांगला असु शकतो;परंतु यात अनेक त्रुटी आहेत.

आज वाहतूकीच्या बळावर देशातील संपूर्ण उलाढाल होत असते.वाहतूक सुरळीत आहे म्हणून प्रत्येक वस्तू तळागाळापर्यंत पोहचतात.अशा परिस्थितीत जर संप झाला तर याचे परिणाम देशाच्या १४० कोटी जनतेला भोगावे लागतात.सरकारच्या मोटार वाहन कायद्याच्या विरोधात वाहतूकदारांना अचानक रस्त्यावर का उतरावे लागले? किंवा संपाचा मार्ग का अवलंबावा लागला? याचा विचार सरकारने गांभीर्याने केला का? सरकारने कायदा बनवितांना मोटार वाहतूक संघटनांशी अगोदर चर्चा केली का? देशातील संपूर्ण राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली का? यावरून स्पष्ट होते की सरकारने कोणत्याही संघटनांशी किंवा देशातील राज्यांच्या वाहतूक संबंधित विभागांशी किंवा संघटनांशी चर्चा न करता नवीन मोटार वाहन कायदा बनविल्याचे दिसून येते.दुर्घटनांवर आळा बसावा व गुन्हेगारांना योग्य शिक्षा व्हावी हे योग्य व मान्य आहे व याचे स्वागत सर्वच स्तरातून व्हायला पाहिजे आणि होईल सुध्दा.परंतु वाहन चालकांच्या हातुन चुकीने जर दुर्घटना घडली तर त्यांच्या तुटपुंज्या पगारातुन त्याने ७ लाख रुपये दंडाची रक्कम कोठुन भरावी.हिट ड रन कायद्यात दोन वर्षांची सजा होती तीला एकदम १० वर्षे करने कितपत योग्य आहे. यामुळे दुर्घटनांवर आळा बसेल काय? याचाही विचार सरकारने करायला हवा.फक्त कायदा बनवुन चालणार नाही तर,सरकारने सुध्दा दुर्घटनांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे व त्या-त्या पध्दतीचे नियोजन असायला हवेत.संसदेत मंजूर झालेल्या भारतीय न्यायिक संहिता २०२३ या कायद्यानुसार हिट ण्ड रन प्रकरणात संबंधित दोषी चालकाला ७ लाख रुपयांपर्यंत दंड आणि १० वर्षांपर्यंतच्या तुरूंगवासाची तरतूद आहे.नवीन वाहन कायद्यातील १० वर्षाची शिक्षा ठिक आहे.परंतु ७ लाख रुपये दंड कोठुन भरणार.त्या वाहन चालकाचा पगार किती असतो याचा विचार सरकारने केला का? त्यांच्या परिवाराचा खर्च यांचा एकुण विचार केला का?आज वाहन चालकांचा तुटपुंजा पगार त्यात त्यांच्या परिवाराचा खर्च आणि अचानक त्याच्या हातुन चुकीने दुर्घटना झाली तर तो शिक्षा तर भोगुन घेईल.परंतु त्यांच्या जवळ ७ लाख रुपये येणार कोठुन याचा सरकारने कायदा बनवितांना थोडातरी विचार केला का? आणि दहा वर्षे शिक्षेच्या काळात त्याच्या परिवारावर काय परिणाम होईल याचाही विचार व्हायला हवा.अशा परिस्थितीत जर त्यांच्या घरच्यांना अट्याक आला किंवा मोठा आजार झाला तर!असे अनेक प्रश्न उद्भवतात.यामुळेच देशासह महाराष्ट्राच्या विविध भागांमध्येही ट्रकचालक, वाहतूकदारांनी आक्रमक भूमिका घेऊन संप पुकारला होता.परंतु आता सरकारच्या लक्षात येत आहे की नवीन मोटार वाहन कायद्यात दुरुस्ती करण्याची गरज आहे.भारतीय दंडविधानाच्या कलम २७९(निष्काळजीने वाहन चालवणे),३०४-अ (निष्काळजीने मृत्यू होणे) आणि ३३८ (दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणे) अंतर्गत हिट ण्ड रन प्रकरणातील दोषी ट्रक-बसचालकाला सध्या दोन वर्षांच्या कारावासाची तरतूद आहे.परंतु नवीन मोटार वाहन कायदा दुरुस्ती नंतर कलम १०४ (२) अंतर्गत एखादा चालक अपघातानंतर घटनास्थळावरून पळून गेला किंवा त्याने पोलिस किंवा दंडाधिकाऱ्यांना अपघाताची माहिती दिली नाही,तर त्याला सध्याच्या पाचपट म्हणजे १० वर्ष तुरूंगवास व जबर दंड म्हणजे ७ लाख रुपये हा सरकारचा घाईघाईने घेतलेला निर्णय असल्याचे मी समजतो.त्यामुळे या नवीन कायद्यातील त्रुटींचा तज्ञांच्या मदतीने विचार करून पुढील पावले सरकारने उचलावीत.आपण साधारणतः विचार केला तर वाहतूकदारांमध्ये ८० टक्के लोक गरीब टपक्यातील असतात आणि बाकी सर्वसाधारण किंवा श्रीमंत असतात एखाद्या श्रीमंत व्यक्तींच्या हाताने दुर्घटना झाली तर तो ७ लाखांपर्यंत दंड सहज भरू शकतो. परंतु गरीब व सर्वसामान्य व्यक्ती एवढी रक्कम आणणार कोठून हाही विचार सरकारने करायला पाहिजे.कोणतीही दुर्घटना असो ती दुःखद आहे.यात कोणाचा तरी आप्त असतोच त्याचे दुःख भयावह असते यात दुमत नाही.मुख्यत्वेकरून कोणत्याही दुर्घटना असो ह्या सांगुन येत नाही अचानक होतात आणि ह्या संपूर्ण मानवाच्या चुकांमुळे होतात व त्याचे प्रायश्चित्त संपूर्ण परिवाराला दुःखाच्या स्वरूपात भोगावे लागतात ही सत्य परिस्थिती आहे.हिट ड रन कायद्याअंतर्गत सर्वसामान्यांचा बळी जाणार नाही याचीही दक्षता सरकारने घेतली पाहिजे व गुन्हेगारांना सजाही मिळाली पाहिजे यापध्दतीने नवीन मोटार वाहन कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रयत्न सरकारने करावा.दारू पिऊन वाहन चालवितांना दुर्घटना, मुद्दाम कोणाचा बळी घेण्याच्या उद्देशाने दुर्घटना अशांसाठी १० वर्षांची शिक्षा व ७ लाख रुपये दंड योग्य आहे.परंतु चुकीने होणाऱ्या दुर्घटनांच्या बाबतीत सरकारने सविस्तर चर्चा करून पुढील पाऊले उचलावीत असे माझे मत आहे.त्याच बरोबर वाहन चालक व मालक यांना नम्र विनंती आहे की वाहन चालवितांना आपल्या प्रमाणे दुसऱ्याच्या जिवाचा सुद्धा विचार करावा यातच खरे आयुष्य व खरी मानुसकी आहे.आपण सर्वच चालक-मालक होणाऱ्या दुर्घटनांवर आळा घालण्यासाठी सरकारशी व जनतेशी संवाद प्रस्थापित करण्यासाठी कटिबद्ध असावे हिच अपेक्षा! दुर्घटनांच्या बाबतीत मी हेच सांगेल की जान है तो जहान है हा मुलमंत्र सर्वांनीच अंगिकारून वाहन चालवावे व दुर्घटनांवर आवर घालावा.

******************************

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# डॉ. बाबासाहब आंबेडकर जी ने मनुस्मृती सार्वजनिक तौरपर क्यो जलायी? इस विषयपर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाला संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवन में कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारा के हितैषीयों को जागृत करते हुए डॉ. बाबासाहब आंबेडकर जी के वैचारिक आंदोलन का कारवाँ साथ लेकर आगे जाणे के लिए डॉ. बाबासाहब आंबेडकर जी को समझ लेना आवश्यक है। समाज जीवन के वर्तमान स्थिती का आकलन किया तो डॉ. बाबासाहब आंबेडकर जी ने २५ दिसंबर १९२७ को महाड परिषद में मनुस्मृती का दहन किया था। इस कृती के ९६ वे वर्धापन दिन के अवसरपर डॉ. बाबासाहब आंबेडकर जी ने मनुस्मृती दहन की कृती क्यों की थी? यह समझ लेने के लिए इस ज्वलंत विषय की प्रासंगिकता को ध्यान में रखते हुए बाबासाहब आंबेडकर जी ने सार्वजनिक तौरपर मनुस्मृती क्यों जलायी? इस विषयपर २५ दिसंबर २०२३ को फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल की और से जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, (औरंगाबाद), महाराष्ट्र यहापर एक दिवसीय कार्यशाला का आयोजन किया गया था।

इस कार्यशाला को फुले आंबेडकर अभ्यास समूह के संयोजक डॉ. शशिकांत पट्टेकर इन्होंने विस्तार से मार्गदर्शन किया। उन्होंने कहाँ की, डॉ. बाबासाहब आंबेडकर जी ने मनुस्मृती क्यों जलायी? यह समझने के लिए इतिहास को जानना होगा। उस में ब्राह्मणी वर्चस्व में रहनेवाला भारत और ब्राह्मणेत्तर गणराज्यीय भारत, मौर्य साम्राज्यीय बौद्ध भारत साथ साथ ब्राह्मणी, मुघल और ब्रिटिश साम्राज्य स्थापित भारत भी समझ लेना चाहिए ताकि वास्तविक चित्र स्पष्ट हो जाएगा। सम्राट अशोक को बुद्ध ना मिले होते तो अशोक महान ना होते। मुघल साम्राज्य का पहला इतिहास पाठ्यक्रम में क्यों नहीं पढ़ाते? इस्लाम की स्थापना प्राफेट मोहम्मद इन्होंने ७ वे ८ वे शताब्दी में हुयी। १२ वी शताब्दी में मंगोलिया से चंगेज खान भारत में राज कारभार के लिए ही आया था। प्रतिष्ठान नगरी में सातवाहनों का राज था, जिसपर बुद्धिझम का गहरा प्रभाव था। बुद्ध तत्त्वज्ञान में कहीं भी मनुस्मृती का उल्लेख नहीं है, इसका सिधा मतलब होता है की, मनुस्मृती यह बुद्ध के बाद में लिखी गयी है।

मनुस्मृती में पाखंडी लोगों को नीच घोषित किया गया है। शंकराचार्य के गुरू कुमारील भट ने बुद्ध को भी पाखंडी घोषित किया है? मनुस्मृती में ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य और शूद्र ऐसी चातुर्वर्ण्य व्यवस्था बतायी है। जिसमें ब्राह्मण से लेकर शूद्रो तक अधिकार कम कम करते हुए आखिर शूद्रों को अधिकारहीन किया गया, जहाँ ज्ञान, संपत्ती और शस्त्र के शिवा शूद्रों का जीवन अस्तित्वहीन हो गया। ऐसे समयपर शूद्रों ने शेष तीन वर्णोपर क्यों आश्रित रहना चाहिए? उलटा शूद्रों को क्रमिक विषमतापर आधारित जातीव्यवस्था में ढकेल दिया, परिणामवश उनका जीना अर्थहीन हो गया। ऐसे लोगों में डॉ. बाबासाहब आंबेडकर जी ने जान डालने का प्रयास किया।



मनुस्मृतीने ब्राह्मण को विशेष अधिकार होने वाला सर्वोच्च वर्ग करके प्रस्थापित किया। वर्ण व्यवस्था को क्रमिक विषमतापर आधारित जाती व्यवस्था में रुपांतरित किया। विभिन्न सामाजिक समूहों में समाज विरोधी चेतना का निर्माण किया गया। परिणामस्वरूप आपस में ही संघर्ष निर्माण हुआ। शूद्र और महिलाओं का अवमूल्यन हुआ वर्ण, जातीव्यवस्था को अपरिवर्तनीय घोषित किया गया। ऐसे व्यवस्था को अबाधित रखने के लिए सतीप्रथा लायी गयी।भगवद्गीता, वेद, पुराण, मनुस्मृती इनका निर्माण का समयावधी, कालखंड एक ही है, जिसका उद्देश यह सिर्फ़ बुद्ध के विचारधारा को समाप्त करना यही था। मात्र बाबासाहब आंबेडकर जी ने बुद्ध समाज जीवन में स्थापित करने के लिए जीवन समर्पित किया है। इसलिए उन्होंने कहाँ की ऐसे धर्म ग्रंथों को डायनामाईट लगाकर जला देना चाहिए। इसलिए डॉ. बाबासाहब आंबेडकर जी ने मनुस्मृती को सार्वजनिकरुप में जलाया है।

इस कार्यशाला का प्रास्ताविक फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल के संचालक बी. बी. मेश्राम इन्होंने किया है। कार्यशाला के लिए सुभाष मेहेर, एड. विलास रामटेके, टी. एन. थोरात, अनुष्का विलास रामटेके, साक्षी भारत थोरात, सुरज भारत थोरात, सम्यक विलास रामटेके, इंजिनिअर अनंतकुमार खोब्रागडे, रामराव दाभाडे, नंदकुमार पठारे, कविता टिळक, पदम रामटेके, साधू आनंद, समाधान ओंकार इंगळे, कौशल्या समाधान इंगळे, कनिष्क कळासरे, एड. प्रविण जाधव, धन्यकुमार टिळक, मिलिंद मोकळे, राजू कांबळे, दिलीप मेश्राम, डॉ. शशिकांत पट्टेकर, बी. बी. मेश्राम आदी प्रतिनिधी उपस्थित थे। इस तरह से आभार प्रदर्शन से हर्षोल्हास के साथ कार्यशाला का समापन हुआ.

# शाहिद कपूरची बायको मीरानं थंडीत कोरड्या पडणाऱ्या त्वचेसाठी सांगितला १ उपाय, सौंदर्य तज्ज्ञ म्हणतात, सुंदर त्वचेसाठी

सुंदर आणि तरुण दिसायला कोणाला आवडत नाही? आपली त्वचा डाग व पिंपल्सरहित असावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. मात्र, त्यासाठी तुम्हाला त्वचेची काळजी घेणे आवश्यक आहे. हिवाळ्यात त्वचेची अधिक काळजी घ्यावी लागते. कारण– या हंगामात त्वचा कोरडी आणि निस्तेज होते, तसेच त्वचेशी संबंधित आजारांचाही फैलाव होतो. त्यामुळे हिवाळ्यात त्वचेकडे खास लक्ष देणे गरजेचे असते. लोक त्वचा निरोगी ठेवण्यासाठी नेहमी विविध उपाय करून बघतात. निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी विविध सौंदर्य उत्पादनांचाही वापर केला जातो; परंतु त्यामुळेही त्यांना फायदा होत नाही.नुकतीच शाहिद कपूरची बायको मीरा राजपूतने भूतानमध्ये तिच्या नवीन वर्षाच्या सुटीनंतर परत आल्यावर, सतत प्रवास केल्यामुळे तिची त्वचा कशी कोरडी पडली त्याबाबतची माहिती 'शेअर' केली आणि थंडीत कोरड्या पडणाऱ्या त्वचेसाठी एक अतिशय सोपा असा उपाय तिने सांगितला आहे.मीरा राजपूत सांगते, भूतान गारठलेला देश असल्याने माझी त्वचा खूप कोरडी झाली. अशा वेळी कच्च्या दुध फायदेशीर ठरु शकते. तसेच तुम्हाला चांगला वास हवा असेल तर तुम्ही त्यामध्ये थोडे गुलाब जलही घालू शकता. स्वत:चा एक नॅचरल लूकमधला फोटो शेअर करीत तिने ही माहिती दिली आहे. दुसऱ्या एका फोटोमध्ये मीरानं बाऊलमध्ये दिसणाऱ्या दूधाचा फोटो तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीजवर शेअर केला आहे. मीराने



सांगितल्याप्रमाणे कच्चे दूध कोरड्या पडलेल्या त्वचेसाठी चांगला उपाय आहे का, याच विषयावर मुंबई वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या सौंदर्य तज्ज्ञ डॉ. श्रद्धा देशपांडे यांनी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. ती सविस्तर माहिती आपण जाणून घेऊ. डॉक्टर सांगतात, कच्च्या दुधामध्ये फॅट्स, प्रोटीन, व्हिटॅमिन्स, मिनरल्स व लॅक्टोज समाविष्ट असतात. कच्च्या दुधात प्रथिनांचे प्रमाण खूप जास्त असते. ही प्रथिने त्वचा घट्ट करतात. भरपूर फॅट असल्यामुळे कच्चे दूध मॉइश्चरायझर म्हणूनही वापरले जाऊ शकते. लॅक्टिक ॲसिडचा चांगला स्रोत असल्याने कच्चे दूध त्वचा घट्ट ठेवते. कच्च्या दुधात कॅल्शियम, प्रथिने, जीवनसत्त्वे व खनिजे यांसारखे अनेक पोषक घटक असतात; जे त्वचेला मॉइश्चरायझ करतात आणि त्वचा सुंदर बनवतात. दुधात लॅक्टोफेरिन असते; जे एक नैसर्गिक प्रथिन आहे. त्याशिवाय त्यात लॅक्टोबॅसिलस बॅक्टेरियातील दाहकविरोधी गुणधर्म असतात. कच्च्या दुधातील लॅक्टिक ॲसिड आणि प्रोटीन हे घटक त्वचा अधिक मऊ आणि मुलायम करण्यास मदत करतात. कच्च्या दुधात असलेले लॅक्टिक ॲसिड त्वचेतील मृत पेशी काढून टाकते आणि नितळ रंग वाढवते.कच्च्या दुधात भरपूर जीवनसत्त्वे ए, डी, बी–६, बी–१२ बायोटिन, कॅल्शियम, प्रथिने आणि इतर पोषक घटक असतात; जे तुमच्या त्वचेला पोषण देण्याचे काम करतात. कच्च्या दुधाचे हे गुणधर्म तुमच्या त्वचेला हायड्रेट आणि मॉइश्चराइझ करू शकतात. त्यामधील ओमेगा–३ फॅटी ॲसिडसह उच्च चरबीयुक्त बाबी त्वचेचे पोषण आणि हायड्रेट होण्यास मदत करून, कोरडेपणा कमी करतात, असेही त्या नमूद करतात.

# दूध, दही, बटर, पनीर खाऊन शरीर होतं लठ्ठ? तज्ज्ञांनी सांगितले किती प्रमाणात करावे सेवन?

एक कप दुधात आठ ग्रॅम प्रथिने मिळतात. याव्यतिरिक्त, दुग्धजन्य पदार्थ हे कॅल्शियमचा उत्कृष्ट स्त्रोत आहेत.अलीकडच्या काळात दुग्धजन्य पदार्थ फॅट्स वाढवणारे आणि आरोग्यास हानिकारक आहेत, असे सांगितले जाते. पण, हा गैरसमज दूर करणे महत्त्वाचे आहे याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला सविस्तर माहिती देताना नवी मुंबई येथील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलच्या सल्लागार व आहारतज्ज्ञ प्रतीक्षा कदम यांनी स्पष्ट केले की, हा गैरसमज वैज्ञानिक पुराव्यांशी जुळत नाही. खरे तर, एखाद्याला दुग्धजन्य पदार्थांची ॲलर्जी असेल, तरच अशी लक्षणे दिसू शकतात. दुग्धजन्य पदार्थांचे आपल्या एकूण आरोग्यासाठी होणारे असंख्य फायदे आपण ओळखले पाहिजेत. तो संतुलित आहाराचा एक महत्त्वाचा आधार म्हणून त्याचे सेवन केले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.दुग्धजन्य पदार्थ हा उच्च गुणवत्तेच्या प्रथिनांचा समृद्ध स्रोत आहे; जो स्नायूंच्या विकासासाठी आणि महत्त्वाच्या अवयवांच्या योग्य कार्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. एक कप दुधात आठ ग्रॅम प्रथिने मिळतात. कॅलरी घटक : फॅट–फ्री पदार्थ विरुद्ध सर्व दुग्धजन्य पदार्थ फॅट–फ्री किंवा कमी फॅट्स असलेल्या दुधापासून




बनविलेले दुग्धजन्य पदार्थ पौष्टिक असतात आणि त्यांच्यामध्ये कमी कॅलरीदेखील असतात. त्यामुळे फॅट– फ्री किंवा कमी फॅट्स असलेले दुध हे आवश्यक पोषक घटकांशी तडजोड न करता, त्यांच्या कॅलरीजचे सेवन नियंत्रित करू पाहणाऱ्या व्यक्तींसाठी एक योग्य पर्याय ठरतो. पण, हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, सर्व दुग्धजन्य पदार्थांचे मध्यम प्रमाणात सेवन करणे आवश्यक आहे. विशेषत: कमी फॅट्स असलेले पर्याय निवडताना हे लक्षात ठेवले पाहिजे. हा एक संतुलित आहाराचा भाग असू शकतो. अभ्यासात असे दिसून आले आहे, २०१३ च्या अभ्यासात असे दिसून आले आहे

# राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरेशदादा चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन होणार ...!

## राज्य कार्यकारिणीची घोषणा..!

महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची पुनर्गठित संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रविण परमार, बाळासाहेब आढांगळे, विजयकूमार वाव्हळ, संतोष जाधव, निलेश ठाकरे, प्रा. दशरथ रोडे, गोपाळराव लाड, ज्ञानेश्वर बागुल , रफिक सय्यद,सुभाष बिंदवाल अन्य विविध समितीचे सभासदांच्या उपस्थित राज्यस्तरीय बैठक घेतली जाणार आहे.

परळी (प्रतिनिधी) मराठवाड्यात राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने प्रथमच ७ वा वर्धापन दिनाचे उद्घाटन राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष :– सुरज दादा चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून तर राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष : विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षेतेखाली ७ जानेवारी २०२४ रविवार रोजी साजरा होणार आहे. राज्यातील संघाचे महाराष्ट्र राज्य कोअर कमिटीचे सदस्य तथा मुख्य संपादक दै. परळी सन्मान – प्रा दशरथ रोडे यांनी सर्व सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या वर्धापनाच्या कार्यक्रमाला मराठवाड्यात संघाचे नांदेड, परभणी, हिंगोली, छत्रपती संभाजी नगर, बीड, धाराशिव, लातूर, जालना जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष , तालुका अध्यक्ष याच्यासह संपूर्ण कार्यकारिणी सदस्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे बंधनकारक आहे.



राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब आढांगळे राष्ट्रीय उपाध्यक्ष विजयकुमार व्हावळ राष्ट्रीय सभासद तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संतोष जाधव ,राज्य उपाध्यक्ष, राज्य कार्याध्यक्ष, राज्य संघटक, राज्य सदस्य, महाराष्ट्रातील कोकण विभागीय ,पश्चिम महाराष्ट्र विभागीय, खानदेश विभागीय , मराठवाडा विभागीय, विदर्भ विभागीय आणि सर्व जिल्ह्यातील आणि तालुक्यातील शहर प्रतिनिधी या ७ वा वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची नवनिर्वाचित राज्य कार्यकारिणी घोषित करण्यात येणार आहेत. तसेच मुंबई विभाग, कोकण विभाग, खांन्देश विभाग, पश्चिम महाराष्ट्र विभाग, मराठवाडा विभाग, विदर्भ विभागासह नवनिर्वाचित जिल्हा कार्यकारिणी आणि तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात येणार आहे. संघाच्या सभासद आणि विविध समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार असून प्रसिद्धी पत्रकार द्वारे जाहीर केलेली आहे.

# अयोध्येतील प्रमुख चौकाला बाळासाहेबांचे नाव द्या

मुंबई : मनसेचे उपाध्यक्ष सतीश नारकर यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे महत्त्वाची मागणी केली आहे. अयोध्येतील प्रमुख चौकाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे. राम मंदिराच्या सुरुवातीच्या आंदोलनामध्ये बाळासाहेब ठाकरे यांची सक्रिय भूमिका होती. याच प्रकरणी अयोध्येतील मुख्य चौकाला बाळासाहेबांचे नाव देऊन त्यांचा सन्मान करण्यात यावा असे नारकर पत्रात म्हणाले आहेत.अयोध्येमध्ये २२ जानेवारीला अभूतपूर्व सोहळा होणार आहे. या दिवशी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते राम मंदिरात राम लल्लाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी आठ हजार मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत आहेत. त्याआधी मनसेकडून एक महत्त्वाची मागणी करण्यात आली आहे.बाळासाहेब ठाकरे यांनी अयोध्येत झालेल्या घटनेचे समर्थन केले होते. तसेच शिवसैनिकांनी असं केलं असेल तर याचा मला अभिमान आहेत, अशी स्पष्ट भूमिका घेतली होती. यावरुन मनसेने पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिलंय. या पत्राला पंतप्रधान मोदी प्रतिसाद देतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. याआधी ३० डिसेंबरला पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते रेल्वे स्टेशन आणि नव्या विमानतळाचे नामकरण करण्यात आले होते.

# ७ जानेवारी २०२४ रोजी ( उलवे ) नवी मुंबई येथे भव्यदिव्य बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन

नवी मुंबई / के. एच. हनवते :– (उलवे) येथे दिनांक : ०७–०१–२०२४ रोजी प्रथमच भव्यदिव्य बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मी सारा भारत बौद्धमय करिन..! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यास अनुसरून उलवे येथे बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचे प्रमुख पाहुणे : आदरणीय डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर ( भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता




सैनिक दल अध्यक्ष ) उपस्थित राहणार आहेत. व तसेच वंदनिय पुज्य भन्ते डॉ. भिक्खू एस. आर. इंदवंस महाथेरो यांच्या करकमलाने व त्यांच्या शुभ हस्ते या भव्यदिव्य बौद्ध धम्म परिषदेचे उदघाटन होणार असून त्यांच्या उपस्थितीत तसेच देश विदेशातील भिक्खुसंघ व भिखुणी संघ नागपूर उपस्थितीत असणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती निखिल मेश्राम (जीएसटी आयुक्त ) व आदरणीय अनिता मेश्राम ( अतिरिक्त जिल्हाधिकारी ) उपस्थित रहाणार आहेत. तरी सर्व बंधूभगिनींना या जाहीर परिपत्रकाद्वारे विनंती करण्यात येते की, सर्व धम्म उपासक, उपासिका यांनी या धम्म कार्यक्रमास तन मन धनाने सहकार्य करून सहकुटुंब आणि सहपरिवार, मित्रमंडळीसह उपस्थित राहावे. असे आवाहन बौद्ध धम्म परिषद कोअर कमिटी उलवे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उल्हासनगर शहरात बस थांबे दुरुस्त करुन नवीन बस थांब्याची माहीती प्रसिध्द करन्याची मागणी

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर महापालिके कडुन शहरात बस सेवा सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा काही महिन्या पुर्वी केली असुन अद्याप पर्यंत बस सेवा सुरु झाली नाही. दरम्यान या पुर्वी बस सेवा सुरु झाली तेव्हा शहरात बस थांबे तयार करण्यात आले होते. परंतु त्या बस थांब्याची दुरावस्था झाली आहे. तेव्हा आता बस सेवा सुरू करण्या आधी शहरात जे जुने बस थांबे आहेत, त्यांची दुरुस्ती करुन नवीन बस थांब्या ची माहिती प्रसिद्ध करण्याची मागणी समाजसेवक ड प्रशांत चंदनशिव यांनी महापालिका आयुक्त अजिज शेख यांना निवेदनाद्वारे केली आहे.

उल्हासनगर शहरात दोन दशकापुर्वी बस सेवा सुरु झाली होती. मात्र तिकीट भाडे वरुन ही बस सेवा बंद झाली आहे. तेव्हा पासुन महापालिकेची परिवहन सेवा बंद आहे. दरम्यान परिवहन सेवा बंद असताना मात्र महापालिकेची परिवहन समिती सुरु आहे. पुर्वी जी बस सेवा सुरु असताना शहरात बस थांबे तयार करण्यात आले होते . मात्र बस सेवा बंद झाल्यावर बस थांब्यावर काही लोकानी अतिक्रमण केले आहे. तर काही बस थांबे जिर्ण झाले असुन मोडकळीस आले आहेत. दरम्यान शहरात जुने बस थांबे किती आहेत यांची दुरुस्ती करुन नवीन बस सेवा सुरु करण्यासाठी नव्याने बस थांबे किती उभारणार आहेत यांची माहीती महापालिकेने प्रसिध्द करावी अशी मागणी समाजसेवक ड प्रशांत चंदनशिव यांनी महापालिका आयुक्त अजिज शेख यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# राजेंद्र हूंजे यांना दर्पण सेवा गौरव पुरस्कार जाहीर तर पत्रकार रामलिंग तत्तापूरे व रंगनाथ वाघमारे यांना 'दर्पण जीवनगौरव पुरस्कार'..!

अहमदपूर दि.०४ जेष्ठ पत्रकार, संपादक, माध्यम सल्लागार राजेंद्र हूंजे (माजी संपादक साम टिव्ही,मूंबई)यांना साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने दिला जाणारा यंदाचा 'दर्पण सेवा गौरव राज्य पुरस्कार २०२३' जाहीर झाला आहे तर स्थानिक पातळीवर पत्रकार म्हणून कार्यरत असणारे जेष्ठ पत्रकार रामलिंग तत्तापूरे(पत्रकार दै.लोकसत्ता/लोकमत अहमदपूर) व रंगनाथ वाघमारे(पत्रकार दै.संचार/यशवंत चाकूर) यांना साहित्य संगीत कला अकादमी च्या वतीने 'दर्पण जीवन गौरव पुरस्कार २०२३' देवून गौरव करण्यात येणार आहे.साहित्य संगीत कला अकादमी (महाराष्ट्र) अहमदपूर जि.लातूर च्या वतीने प्रत्येक वर्षी पत्रकारीता क्षेत्रात राज्यस्तरावर उल्लेखनीय कार्य करणा–या व्यक्तीस 'दर्पण सेवा गौरव पुरस्कार दिला जातो. शॉल–स्मृतीचिन्ह, लेखनी, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.या पूर्वी जयप्रकाश दगडे (लातूर),राही भिडे मॅडम (मूंबई),राजा





माने (सोलापूर),अशोक सूरवसे (मूंबई),अतुल कुलकर्णी (मूंबई),किरण तारे (मूंबई), यदू जोशी (मूंबई), प्रा.बी.व्हि.मोतीपौळे (लातूर) प्रा.रामेश्वर बद्दर (लातूर)आदींना हा पुरस्कार देवून गौरवण्यात आले आहे. तसेच अहमदपूर व चाकूर तालूक्यात पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देणा–या दोन पत्रकारांची प्रत्येक वर्षी पूरस्कार निवड समितीच्या वतीने निवड करण्यात येते.यंदा जेष्ठ पत्रकार रामलिंग तत्तापूरे(दैनिक लोकसत्ता/लोकमत अहमदपूर ) व रंगनाथ वाघमारे( पत्रकार दैनिक संचार/यशवंत चाकूर) यांना 'दर्पण जिवन गौरव पुरस्कार' देण्यात येणार आहे. शाल– स्मृतीचिन्ह– मानपत्र पूष्पहार असे पुरस्काराचे स्वरूप आहे.या पूर्वी हा पुरस्कार जेष्ठ पत्रकार मा.रा.कराड,प्रा. एस.एम.कूलकर्णी,अ.ना.शिंदे,उदयकुमार जोशी,संदीप अंकलकोटे,बाबूराव श्रीमंगले, रवीकांत क्षेत्रपाळे,प्रशांत शेटे,सूरेश डबीर,सूधाकर हेमनर, संतोष अचवले,प्रा.मारोती बुद्रुक पाटील,दिनकर मद्देवार,भारतसिंह ठाकूर,बलभीम पवार, विलास चापोलीकर यांना प्रदान करण्यात आला आहे.हा पूरस्कार आचार्य बाळशात्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ दर्पण दिनाच्या निमित्ताने रवीवार दिनांक ७ जानेवारी २०२४ रोजी अहमदपूर जि.लातूर येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार असल्याची माहिती साहित्य संगीत कला अकादमी चे अध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी,अजयराव भालेराव, शिवाजीराव गायकवाड, भिमराव कांबळे,गणेशराव मूंडे,प्रशांत जाभाडे,आकाश सांगवीकर,सय्यद याखूब, विलास चापोलीकर,सचिन बानाटे, प्रा.अनिल चवळे, गफारखान पठाण, जीवनराव गायकवाड, मारोती बुद्रुक पाटील, बालाजी कारामूंगेकर, मोहम्मद पठाण,तरबेज सय्यद, प्रा. दिपक बेले, शिवाजी भालेराव, गणेश शिंदे,सय्यद याखूब, राजू सूर्यवंशी, दिलीप भालेराव, प्रा. उध्दव श्रंगारे, सागर क्षीरसागर,ईश्वर कांबळे, बालाजी मस्के,सय्यद नूर,सय्यद नौशाद यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

# आयुष्य सुंदर आहे ते भरभरून जगा ! प्रा. रवी बापटले

लातूर दि. ०४ मानवी आयुष्य नैसर्गिक देणगी आहे. सध्याच्या चंगळवादाच्या नादी न लागता आपले आयुष्य भरभरून जगा असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा आम्ही सेवक संस्थेचे संचालक प्रा. रवी बापटले यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील आय. क्यु. ए. सी., राष्ट्रीय सेवा योजना, समाजकार्य विभाग आणि शासकीय रुग्णालय एड्स नियंत्रण कक्ष, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एड्स जनजागृती कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते विचारमंचावर वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, पदम ढोपरे, अरुण गवळे आणि लिना पांडे आदीची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. बापटले म्हणाले की,



रुग्णांच्या वेदना ह्याच माझ्या प्रेरणा असून एड्सग्रस्त रुग्णाला समाजाने जेव्हा दूर लोटले. तेव्हा माझ्यातील करुणा जागृत होऊन एड्सग्रस्तांसाठी काम करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सेवालयाची स्थापना केली. एड्स हा रोग लैंगिक संबंधातून तयार होणारा संपर्कजन्य असा रोग आहे. या रोगाविषी भीती न बाळगता रक्त तपासणीतून हा रोग लक्षात येतो वेळीच यावर औषध उपचार केल्यास रुग्णाचे आयुष्य वाढते एकमेका विषयी विश्वास वृद्धिंगत करून कोणत्याही मोहाला बळी न पडता या रोगापासून आपण मुक्त राहू शकतो. एड्स हा मानवी समाजाला लागलेला कलंक असून तो पुसण्यासाठी लोकसहभागाची नितांत गरज आहे त्यामुळे तरुणांनी या चळवळीत अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. समाजकार्य विभागप्रमुख डॉ. दिनेश मौने यांनी समायोजित मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असल्यास त्यात संघर्ष अनिवार्य असतो. एड्स जनजागृतीच्या कार्यात रवी बापटले यांना प्रचंड मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागला पण त्यांनी लोकविश्वास कमावून नंतरच्या काळात एड्सग्रस्तांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या पुनर्वसनासाठी मौलिक असे कार्य केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. आशिष स्वामी, प्रा. शंकर भोसले, प्रा. मारुती माळी, प्रा. शिवगीता तुपकरी, प्रा. दत्ता करंडे, भीमाशंकर सुगरे, बालाजी डावकरे, संतोष येचवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात ४१ विद्यार्थ्यांनी रक्त तपासणी केली सर्व विद्यार्थ्यांची तपासणी निगेटिव्ह आली आहे या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने सावित्रीबाई फुले यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

मुंबई दि. ४ :– बौद्धजन पंचायत समिती मुख्य कार्यालय संलग्न मध्यवर्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, स्त्री शिक्षणाची जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा १९३ वा जयंती उत्सव बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष आदरणीय लक्ष्मणजी भगत यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई १२ येथे मोठ्या उत्साह संपन्न झाला. सदर प्रसंगी मध्यवर्ती महिला मंडळाच्या सचिव आणि बौद्धाचार्या अंजलीताई मोहिते यांनी लाघवी व प्रभावी शैलीत सूत्रसंचालन करून सभागृह मंत्रमुग्ध केले, सदर कार्यक्रमास माधवी मोहिते, महिला सचिव माधवी मोहिते, प्राजक्ता कांबळे, सोनाली गायकवाड, प्रज्ञा जाधव, सायली साळवी या महिलांनी आपले विचार व्यक्त करून सावित्रीबाईंना मानवंदना दिली यासर्वांत ७० वर्षीय प्रतिभा मोहिते यांनी वयाच्या सत्तरीत ही मी सावित्री बोलते या विषयावर बोलत असता माता सावित्रीबाईंच्या जन्म, जडणघडण, महात्मा फुलेंसोबत लग्न, वैवाहिक जीवन, पतीच्या खांद्याला खांदा लावून दिलेला लढा, सत्यशोधक समाजाची मुहूर्तमेढ, स्त्री मुक्ती, स्त्रीशिक्षण याकरता केलेली क्रांती ते शेवट हा सर्व थक्क करणारा प्रवास कणखर, खड्या व स्पष्टवाणीने वर्णन करताना त्यांची भाषाशैली, संवादफेक व प्रसंग वर्णन करताना आवाजातील चढ उतार हे सर्व लक्षवेधी व रोमहर्षक ठरले त्याचसोबत त्यांनी सर्व महिलांना सबोधताना सावित्रीच्या लेकींनी सावित्रीला विसरू नये असे केलेले आवाहन सर्वांच्या अंगावर काटा आणून गेला, तसेच अर्थ समितीचे अध्यक्ष अरुण मोरे, उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, पतपेढी अध्यक्ष, विश्वस्त, माजी कार्याध्यक्ष किशोर मोरे, संस्कार समितीचे मनोहर बा. मोरे यांनी देखील माता सावित्रीबाई यांच्या जीवनपटाचा आढावा घेत मौलिक असे विचार व्यक्त केले व सावित्रीबाईंना आदर्श मानून समाजातील सर्वच स्तरातील, जातीतील महिलांनीं एकत्र येऊन सावित्रीबाईंचे विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य अखंडितपणे सुरु ठेवले पाहिजे असा प्रबोधनात्मक संदेश आपल्या विचारातून व्यक्त केला. सदर कार्यक्रमास उपकार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे, सचिव संदेश खैरे, गटक्रमांक १३ चे गटप्रतिनिधी व साहित्य–क्रीडा समितीचे अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, निवडणूक कमिटी अध्यक्ष मिलिंद जाधव, पतपेढीचे तुळशीराम शिर्के,



द्रुपद मोरे आदी मान्यवरांनी उपस्थित लावून सदर कार्यक्रम यशस्वी होण्यास परिश्रम घेतले तसेच मध्यवर्ती महिला मंडळ कार्यकारिणी, उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात मा. लक्ष्मण भगत यांनी सर्व व्यक्तांच्या भाषणाचा आढावा घेत सावित्रीबाई फुले यांनी उभा केलेला लढा, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी मनुवाद्यांकडून सहन केलेला विरोध, शेणाचे गोळे, दगड झेलत स्त्री शिक्षणाची रोवलेली मुहूर्तमेढ तसेक्स विरोधाला सामोरे उपाध्या कशा मिळाल्या व त्यांनी जे परिवर्तन केले त्याकाळी सावित्रीबाई समाजातील सर्व स्तरातील व जातीतील स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुल्या करत होत्या त्यावेळी शिक्षणामुळे धर्म बुडतो म्हणत मनुवाद्यांनी त्यांना विरोध केला पण आज तेच मनुवादी आपल्या समाजातील स्त्रीयांना मोठ्या प्रमाणात शिक्षण देताना दिसत आहेत, भिडेवाड्यातील शाळेस जागतिक दर्जा देण्यास समर्थन करत आहेत हाच सावित्रीबाईंच्या विचारांचा विजय आहे अस प्रतिपादन करत त्यांनी सावित्रीमाईंच्या जीवनातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकला, सरतेशेवटी मध्यवर्ती महिला मंडळाच्या सरचिटणीस अंजलीताई मोहिते यांनी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यास महिला मंडळाला मदत करणाऱ्या सर्वांचे, तसेच वक्ते, उपस्थित पाहुणे यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.


# बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने सावित्रीबाई फुले यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

मुंबई दि. ४ :– बौद्धजन पंचायत समिती मुख्य कार्यालय संलग्न मध्यवर्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, स्त्री शिक्षणाची जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा १९३ वा जयंती उत्सव बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष आदरणीय लक्ष्मणजी भगत यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई १२ येथे मोठ्या उत्साह संपन्न झाला. सदर प्रसंगी मध्यवर्ती महिला मंडळाच्या सचिव आणि बौद्धाचार्या अंजलीताई मोहिते यांनी लाघवी व प्रभावी शैलीत सूत्रसंचालन करून सभागृह मंत्रमुग्ध केले, सदर कार्यक्रमास माधवी मोहिते, महिला सचिव माधवी मोहिते, प्राजक्ता कांबळे, सोनाली गायकवाड, प्रज्ञा जाधव, सायली साळवी या महिलांनी आपले विचार व्यक्त करून सावित्रीबाईंना मानवंदना दिली यासर्वांत ७० वर्षीय प्रतिभा मोहिते यांनी वयाच्या सत्तरीत ही मी सावित्री बोलते या विषयावर बोलत असता माता सावित्रीबाईंच्या जन्म, जडणघडण, महात्मा फुलेंसोबत लग्न, वैवाहिक जीवन, पतीच्या खांद्याला खांदा लावून दिलेला लढा, सत्यशोधक समाजाची मुहूर्तमेढ, स्त्री मुक्ती, स्त्रीशिक्षण याकरता केलेली क्रांती ते शेवट हा सर्व थक्क करणारा प्रवास कणखर, खड्या व स्पष्टवाणीने वर्णन करताना त्यांची भाषाशैली, संवादफेक व प्रसंग वर्णन करताना आवाजातील चढ उतार हे सर्व लक्षवेधी व रोमहर्षक ठरले त्याचसोबत त्यांनी सर्व महिलांना सबोधताना सावित्रीच्या लेकींनी सावित्रीला विसरू नये असे केलेले आवाहन सर्वांच्या अंगावर काटा आणून गेला, तसेच अर्थ समितीचे अध्यक्ष अरुण मोरे, उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, पतपेढी अध्यक्ष, विश्वस्त, माजी कार्याध्यक्ष किशोर मोरे, संस्कार समितीचे मनोहर बा. मोरे यांनी देखील माता सावित्रीबाई यांच्या जीवनपटाचा आढावा घेत मौलिक असे विचार व्यक्त केले व सावित्रीबाईंना आदर्श मानून समाजातील सर्वच स्तरातील, जातीतील महिलांनीं एकत्र येऊन सावित्रीबाईंचे विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य अखंडितपणे सुरु ठेवले पाहिजे असा प्रबोधनात्मक संदेश आपल्या विचारातून व्यक्त केला. सदर कार्यक्रमास उपकार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे, सचिव संदेश खैरे, गटक्रमांक १३ चे गटप्रतिनिधी व साहित्य–क्रीडा समितीचे अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, निवडणूक कमिटी अध्यक्ष मिलिंद जाधव, पतपेढीचे तुळशीराम शिर्के, द्रुपद मोरे आदी मान्यवरांनी उपस्थित लावून सदर कार्यक्रम यशस्वी होण्यास परिश्रम घेतले तसेच मध्यवर्ती महिला मंडळ कार्यकारिणी, उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात मा. लक्ष्मण भगत यांनी सर्व व्यक्तांच्या भाषणाचा आढावा घेत सावित्रीबाई फुले यांनी उभा केलेला लढा, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी मनुवाद्यांकडून सहन केलेला विरोध, शेणाचे गोळे, दगड झेलत स्त्री शिक्षणाची रोवलेली मुहूर्तमेढ तसेक्स विरोधाला सामोरे उपाध्या कशा मिळाल्या व त्यांनी जे परिवर्तन केले त्याकाळी सावित्रीबाई समाजातील सर्व स्तरातील व जातीतील स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुल्या करत होत्या त्यावेळी शिक्षणामुळे धर्म बुडतो म्हणत मनुवाद्यांनी त्यांना विरोध केला पण आज तेच मनुवादी आपल्या समाजातील स्त्रीयांना मोठ्या प्रमाणात शिक्षण देताना दिसत आहेत, भिडेवाड्यातील शाळेस जागतिक दर्जा देण्यास समर्थन करत आहेत हाच सावित्रीबाईंच्या विचारांचा विजय आहे अस प्रतिपादन करत त्यांनी सावित्रीमाईंच्या जीवनातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकला, सरतेशेवटी मध्यवर्ती महिला मंडळाच्या सरचिटणीस अंजलीताई मोहिते यांनी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यास महिला मंडळाला मदत करणाऱ्या सर्वांचे, तसेच वक्ते, उपस्थित पाहुणे यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.


# दिपगंगा भागीरथी संस्थेकडून सिद्धार्थ तायडे यांना राज्यस्तरीय निर्भिड पत्रकारिता पुरस्कार जाहीर

नांदुरा : तालुक्यातील ग्राम वडनेर भोलजी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार यांना त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामाची दखल घेऊन त्यांना दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित शारदा वृद्धसेवाश्रम आयोजित दिपगंगा भागीरथी राज्यस्तरीय निर्भिड पत्रकारिता पुरस्कार २०२३ जाहीर करण्यात आला आहे. रविवार दि.७ जानेवारी २०२४ रोजी बालगंधर्व नाट्यमंदिर मिरज, जि. सांगली येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात मा. आमदार सुधीर दादा गाडगीळ, मा. विशाल लोंढे आयुक्त समाज कल्याण पुणे, मा. हरखचंद सावला, मा. ज्योती पाटील निवासी उपजिल्हाधिकारी तथा उप दंडाधिकारी सांगली, मा. प्रणिल गिल्डा उपविभागीय पोलीस अधीक्षक मिरज विभाग, मा. अविनाश पाटील पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे कुपवाड, संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष हिंदरत्न दिपक लोंढे ( साहित्यिक समाजसेवक ) अनाथांची नाथ समाजसेविका मा. शारदा लोंढे अशा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक ,वैद्यकीय ,क्रीडा, उद्योग पत्रकारिता आदी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र



राज्य संचलित शारदा वृद्धसेवाश्रम च्या वतीने पुरस्कार प्राप्त व्यक्तीचा हा सन्मान सोहळा पार पडणार आहे. सामाजिक जाणीवतेचे भान ठेवून समाजात समाजाच्या प्रबोधनासाठी पत्रकार म्हणून काम करणारे युवा शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तायडे यांना दिपगंगा भागीरथी राज्यस्तरीय निर्भिड पत्रकारिता पुरस्कार २०२३ देऊन गौरविण्यात येणार आहे. या मिळालेल्या पुरस्काराबद्दल सिद्धार्थ तायडे यांचेवर नातेवाईक, मित्रमंडळी आणि हितचिंतक अशा अनेक क्षेत्रांतून अभिनंदनचा व पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आता गुरुवार ठरला ज्येष्ठ नागरिकांचा आरोग्य सेवा दिन; आजपासून झाली जिल्ह्यात सुरुवात

लातूर दि. ४ (जिमाका): ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचे वाढते प्रश्न लक्षात घेऊन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या सूचनेवरून आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली आठवड्याचा प्रत्येक गुरुवार हा प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी योगासने, मानसिक समुपदेशन, मधुमेह, रक्तदाब याची प्राथमिक चाचणी होणार आहे.

आज पाखरसांगवी (ता. लातूर) उपकेंद्रातून या जिल्हास्तरीय योजनेची सुरवात विभागीय आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे व उपकेंद्राचे डॉक्टर, इतर कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक यांच्या उपस्थितीत झाली.

लातूर जिल्ह्याला आरोग्य सेवेत केलेल्या कार्यसाठी देशपातळीवर गौरविले आहे. इथून पुढे ह्या दर्जात आणखी सुधारणा करण्यासाठी जिल्हास्तरावरून मोठे प्रयत्न केले जात आहेत. राज्य स्तरावरूनही आरोग यंत्रणा बळकट करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. बालकं आणि जेष्ठ नागरिक हे आरोग्याच्या बाबतीत बहुतांशवेळी घरच्यांवर अवलंबून असतात. त्या बालकांना पालक म्हणून काळजी घेणारे असतात पण जेष्ठाच्या बाबतीत म्हणावे तसे सहकार्य होत नाही आणि ६० वर्षानंतर त्यांच्या आरोग्याच्या समस्या सुरु होतात म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर –घुगे यांनी ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणारा दिवस म्हणून गुरुवार निवडायच्या सूचना केल्या त्या प्रमाणे या आठवड्या पासून दर गुरुवारी जेष्ठ नागरिकांच्यासाठी विशेष तपासण्या आणि मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन, योगा घेतला जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे यांनी दिली.

यावेळी आरोग्य विभागाच्या उपसंचालक डॉ. अर्चना भोसले आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी यांनी उप केंद्राचे कामकाज जाणून घेतले. तिथल्या औषधाचा साठा. डॅश बॉर्डवर असलेली माहिती, त्यात एकूण




लोकसंख्यातील ३० वर्षाच्या पुढची लोकसंख्या त्यांची तपासणी, तपासणीनंतर पुढच्या हॉस्पिटलला निदानासाठी पाठवून त्याची खात्री करून त्यांना औषधोपचार सुरु केले जातात. अशी माहिती आरोग्य उप केंद्राच्या डॉ. वाघमोडे यांनी दिली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या उपसंचालक डॉ. अर्चना भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व जेष्ठ नागरिकांच्या तपासण्या करण्यात आल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE